ISSN: 0973-9483

# 1st International Conference On Universal Human Values

Organized By The
Bahá'í Academy
(A Recognized Institution of Shivaji University),
In Association With the
Dept. Of Education, Shivaji University,
And
International Institute of Organizational Psychological Medicine
(IIOPM), Australia

Panchgani, 11-12 June 2016

# THE COMPASS

(Special Issue)
Vol. 10, No. 1, November 2016

## SOUVENIR

- [ ] Part 1- Conference Report
- [x] Part 2- Papers Presented
- [ ] Part 3- Papers Presented (Continuation)

The magazine of the Bahá'í Academy, Panchgani, an insitution engaged in research and action in the field of value education for institution of higher learning

ISSN: 0973-9483

# 1st International Conference On Universal Human Values

Organized By The

Bahá'i Academy

(A Recognized Institution of Shivaji University),

In Association With the

Dept. Of Education, Shivaji University,

And

International Institute of Organizational Psychological Medicine

(IIOPM), Australia

Panchgani, 11-12 June 2016

THE COMPASS

(Special Issue)

Vol. 10 , No. 1 , November 2016

## SOUVENIR

- [ ] Part 1- Conference Report
- [x] Part 2- Papers Presented
- [ ] Part 3- Papers Presented (Continuation)

The magazine of the Bahá'i Academy, Panchgani,
an insitution engaged in research and action in the
field of value education for institution of higher learning

# परभणी येथील दोन अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर मानवी मूल्य रुजविण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमाचा चिकित्सक अभ्यास

**लेखक: श्री. सचिन अशोक पोरे[१] आणि डॉ.कविता साळूंके[२]**

[१] पीएच.डी. संशोधक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक,
मो.: ९०२१२४४५७७, इ-मेल: S.spore777@gmail.com

[२] सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक,
मो.: ७०२८३८०९१३, इ-मेल: Kavita_salunke@hotmail.com

**सारांश**

मानवी मूल्ये ही मानवाच्या सर्वांगीण विकासामध्ये अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असतात. मानवी मूल्ये म्हणजे मानवी वर्तन होय. अशी मानवी मूल्यांबाबत व्याख्या आहे. (रेवाडकर १९९८ ) दुसरी व्याख्या भारतीय संस्कृतीने काही मानवी मूल्ये दिली आहेत. मूल्यांचे आचरण व मनुष्याच्या मानसिकतेमध्ये टिकाऊ स्वरुपाचे परिवर्तन म्हणजे मानवी मूल्य होय. (करंदीकर १९९७)यातून मानवाने चारित्र्यशील, सुजाण व शीलवान नागरिक म्हणून जगणे अपेक्षित आहे.

देशाच्या जडणघडणीमध्ये अध्यापक खुप मोठी जबाबदारी पार पाडत असतात. समाजातील प्रश्न, वास्तवता, समस्या, भविष्यातील आव्हाने यांवर योग्य उपाययोजना करता यावी म्हणून अध्यापक हे विद्यालयात विद्यार्थ्यांवर योग्य ते संस्कार घडवित असतात.

देशामध्ये सद्यस्थितीत शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. माणूस फक्त पैसा व प्रसिध्दीच्या हव्यासापायी मूल्ये विसरत चालला आहे. उच्च शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांमधील विविध घटना पाहिली असता मानवी मूल्यांची हेळसांड होताना दिसून येते. पाश्चिमात्य संस्कृतीचे आचरण, चंगळवाद, भोगवाद यास तरुण पिढी प्राधान्य देत आहे.

देशामध्ये काही लोक देशविरोधी वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. देशाला आतंकवाद, दहशतवाद, अतिरेकी कारवाया, भ्रष्टाचार, वर्णद्वेश, स्त्री-अत्याचार इ. प्रश्न भेडसावत आहेत. सर्वधर्म समभाव, स्त्री-पुरुष समानता व वैज्ञानिक दृष्टीकोन, सौजन्यशिलता, नीटनेटकेपणा मानवी मूल्यांना ठेच पोहचविणाऱ्या  घटना वारंवार घडत आहेत.

सदरील घटना घडू नयेत म्हणून अध्यापक महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या भविष्यातील अध्यापकांवर खुप मोठी जबाबदारी आहे. अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर मूल्यांची रुजवणूक झाली तर त्यांच्याद्वारे घडणारे विद्यार्थी मूल्यांविषयी संवेदनशील असतील. त्यासाठी मानवी मूल्यांची रुजवणूक व्हावी म्हणून कोणते उपक्रम राबविण्यात येतात? हे पाहण्याचा प्रयत्न संशोधकाने सदरील शोधनिबंधाच्या माध्यमातून केला आहे.

वरिल विषयाला अनुसरुन संशोधकाने परभणी येथील दोन अध्यापक महाविद्यालयातील १०० विद्यार्थ्यांची व दोन प्राचार्यांची नमूना म्हणून निवड केली. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली या साधनांचा वापर केला व प्राचार्यांच्या मुलाखती  घेतल्या व त्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. त्यामधून प्राप्त निष्कर्ष मुख्य शोध निबंधामध्ये देण्यात आले आहेत.

**बीजसंज्ञा:** चिकित्सक अभ्यास

## प्रस्तावना

मानवी मूल्ये ही मानवाच्या विकासामध्ये अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असतात. 'मानवी मूल्ये' म्हणजे मानवी वर्तन होय. मानवी मूल्यांमूळे मानवांमध्ये प्रेम, आपूलकी सहकार्य करण्याची वृत्ती, निटनेटकेपणा, राष्ट्रीय एकात्मता, वक्तशीरपणा, सौजन्यशिलता, सर्वधर्मसहिष्णुता, स्त्री-पुरुष समानता, इ. विषयी जाणीव निर्माण होते.

अध्यापक हा राष्ट्रउभारणीमध्ये सामाजिक अभियंता म्हणून ओळखला जातो. देशाच्या जडणघडणीमध्ये अध्यापक खुप मोठी जबाबदारी पार पाडत असतात. सद्यस्थितीत देशात शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. मात्र मानवी मूल्यांची जाणीव व जागरुकता या संदर्भात रुजवणूक झाली आहे असे वाटत नाही. ह्महणून प्राथमिक स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत मूल्यांविषयी जाणीव जागृती करण्याची गरज निर्माण झाली आहे.

अध्यापक महाविद्यालयातील भावी अध्यापकांवर मानवी मूल्यांची रुजवणूक व्हावी म्हणून कोणते उपक्रम अध्यापक महाविद्यालयामध्ये घेण्यात येतात. याचा अभ्यास संशोधकांनी केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:** प्रस्तूत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. शालेय स्तरावर अभ्यासक्रमात समाविष्ठ मानवी मूल्यांचा शोध घेणे.
२. अध्यापक महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा अभ्यास करणे.